# काँग्रेसनेच केला पनवेलचा विकास!

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रशांत ठाकूर पनवेलचे आमदार झाल्यानंतर शहराच्या विकासाने गती घेतली. नागरिकांच्या अपेक्षा व शहराची गरज विचारात घेऊन काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील सत्तेने शहरवासीयांना अनेक अद्ययावत सेवा-सुविधा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व प्रभाग क्रमांक ६ काँग्रेस कमिटीच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, छत्रीवाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. रेशीमगाठी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते जी. आर. पाटील, नगराध्यक्षा चारुशीला घरत, नगरसेवक जयंत पगडे, नगरसेवक मनोहर म्हात्रे, अलका भगत, गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, पूर्वी पनवेल शहर छोटे होते, लोकसंख्या मर्यादित होती, पण आज शहर चोहोबाजूने वाढतेय. लोकांच्या गरजा वाढत आहेत. त्यांना नागरी सेवा-सुविधा पुरविण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला आहे. पनवेलकरांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करून त्यांच्या अपेक्षापूर्तीसाठी अनेक नवनवीन उपक्रम राबविले आहेत. शहरातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण, डांबरीकरण केले. नाट्यगृह उभारून नवी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. उड्डाणपूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, प्रशासकीय भवन, १०० खाटांचे रुग्णालय, न्यायालयाची नवीन इमारत आदी कौतुकास्पद कामे आणि पनवेलकरांसाठी पालिकेच्या माध्यमातून बससेवा सुरू करीत आहोत. शाळांच्या इमारतींचे पुनर्निर्माण करून त्यांचा चेहरामोहरा बदलून टाकला. हे सगळे काँग्रेसने केले आहे. जनतेच्या हितासाठी कोण काम करतो हे पनवेलकरांना चांगले माहीत आहे. त्यामुळे कुणी कितीही बोंब मारली तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. आज ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यामागे चांगल्या कामाला त्यांचा आशीर्वाद मिळावा हा उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. जी. आर. पाटील यांचेही भाषण झाले. नगरसेविका निर्मला म्हात्रे यांनी प्रास्ताविक केले.